ISBN -978-93-84309-11-4

SAVITRIBAI PHULE
PUNE UNIVERSITY, PUNE

NAAC Accreditation'A' Grade

Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

## National Seminar on

# Status of Judicial Activism in India

Editor -In-Chief
**Prof. Rahul Pandit**

Principal
**Dr. Bhaskar Shelke**




Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

**B.C.U.D. Savitribai Phule Pune University, Pune**

**Sponsored**

**Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's**


# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

***Department of Political Science***
***organized***

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India




Date : 12 th & 13 th February 2016.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 38 | भारतीय न्यायव्यवस्थेतील कौटुंबिक न्यायालयाची भूमिका | प्रा. धिरज भिमशा शाखापुरे . | १३३-१३४ |
| 39 | न्यायालयीन स्वातंत्र्य आणि भारतीय संसद | प्रा. ढारगे महादेव माणिकराव | 135.136 |
| 40 | न्यायालयीन कार्यपध्दतीत मानसशास्त्रीय संकल्पनांचे उपयोजन | प्रा. खिलारे संदीप सिताराम | 137.139 |
| 41 | जनहित याचिका व न्यायालयीन भूमिका | प्रा. शरद मनसुख | 140.141 |
| 42 | लोकशाही सशक्तीकरणासाठी न्यायालयीन सक्रियतेची भूमिका | प्रमोद भगवानराव जाधव | 142.145 |
| 43 | मानवीहक्कांचे संरक्षण व न्यायालयीन सक्रीयता | प्रा. एकनाथ वाजगे | 146.148 |
| 44 | भारतीय राज्यघटना व न्यायालयीन सक्रीयता | श्री. सचिन नागोराव कसबे | 149.151 |
| 45 | भारतीय न्यायालयीन सक्रीयता एक दृष्टीक्षेप | कुचेकर एच. एस. | 152.154 |
| 46 | न्यायालयीन सक्रियेतेच्या भूमिकेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची कोंडी? | प्रा. राजेंद्र भोईवार | 155-157 |
| 47 | न्यायपालिकेची सक्रीयता | प्रा. चंदन गणेशराज सोनाळे | 158.159 |
| 48 | न्यायालयीन सक्रियता : कारणे आणि उपाय | प्रा. डॉ. विलास आघाव<br>प्रा. डॉ. सुधाकर मालेराव | 160.162 |
| 49 | **केशवानंद भारती खटला** | **प्रा.राहुल पंडित विशाल रणखांब** | १६३-१६४ |
| 50 | भारतातील न्यायालयीन कृतिशीलता | डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल | 165.168 |
| 51 | मानवी हक्काचे संरक्षण आणि न्यायसंस्थेची भुमिका | प्रा.साळवे गौतम गणपती | 169.172 |
| 52 | जनहित याचिका :सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. मिरकुटे ई.जी..<br>डॉ. आर . डि. शिंदे | 173.174 |
| 53 | जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रीयता | प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव | 175.176 |
| 54 | संसद, न्यायालये आणि संविधान | प्रा. माधव चोले | 177.179 |
| 55 | भारतातील न्यायालयीन सक्रियता : एक अभ्यास | प्रा. काटकांबळे ना. तुकाराम | 180.185 |
| 56 | राष्टीय एकातमतेत आणि न्यायववसथेत भारतीय राज्य घटनेची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप | 186.188 |
| 57 | डॉ. बी आर. आंबेडकर आणि न्यायपालिका | मकरंद रामराव गिरी | 189.192 |
| 58 | मानवी संरक्षणात्मक कायदे आणि न्यायालयाची भूमिका | प्रा. एल.एन.कुमारे | 193.195 |
| 59 | मानवी हक्क आणि न्यायव्यवस्था | बबन गोविंद राठोड | 196.197 |
| 60 | जनहित याचिकेमध्ये न्यायालयाची भूमिका | चौधरी प्रदीप विनायक | 198.200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : ग्रामीण विकास आणि न्यायविषयक दृष्टिकोन | कमले हणमंत विठ्ठलराव | 201.205 |
| 62 | भारतीय राज्यघटनेच्या संरक्षणामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाची भूमिका | पटेकर संजय कारभारी | 206.208 |
| 63 | न्यायालयीन सक्रीयता आणि भारतीय लोकशाही | व्हि. एस. संबेटवाड | 209.210 |
| 64 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे न्यायव्यवस्थे विषयक विचार | कढरे चंद्रकांत सिध्दार्थ | 211.212 |


Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# मानवीहक्कांचेसंरक्षण व न्यायालयीनसक्रीयता

**प्रा. एकनाथ वाजगे**
श्री शिव छत्रपती महाविद्यालय
जुन्नर, पुणे.

मानवी हक्कांची संकल्पना ही नैसर्गिकविधी या संकल्पनेचेअपत्य आहे.जन्मानेच माणूस काही मूलभूत हक्क घेऊन येतो. या गृहितकृत्यांवर ह्या हक्कांची मांडणी करण्यात आली आहे. मानवी हक्कांची संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्वज्ञानात आणि थॉमस ॲक्वायनसारख्या विचारवंतांच्या लिखानातूनही मांडली गेल्याचे दिसते. मानवी संस्कृतीच्या वेगवेगळया टप्यांवर मानवास जगण्याकरिता आवश्यक असणाऱ्या हक्कांसाठी निरनिराळया संज्ञा वापरल्या आहेत. मानवी हक्कांमध्ये जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य, अन्न मिळविण्याचा हक्क, गुलामगिरीपासून मुक्ततेचा हक्क, व्यक्तीच्या खासगीपणाचा हक्क, संपत्तीवर मालकीचा हक्क, क्रूर, अमाणूश व अपमानास्पद वागणूकीपासून संरक्षणाचा हक्क यांसारख्या अनेक हक्कांचा समावेश होतो.

संयुक्त राष्ट्राने मानवी हक्काची केलेली व्याख्या अशी''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे माणूस म्हणून जन्मल्यामुळे सर्वमानवांना मिळाले पाहीजेत. हे हक्क उपभोगल्याशिवाय मानवांना माणूस म्हणून खऱ्या अर्थाने जगणे शक्य नाही"

जागतिक स्तरावर 10 डिसेंबर 1948 मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. 1966 साली संयुक्तराष्ट्र संघटनेने नागरिक व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय जाहिरनामा लागू केला. तो 1948च्या जाहिरनाम्यास पूरक मानला जातो. यामध्ये मोफत कायद्याचा सल्ला मिळण्याचा हक्क, मोफत प्राथमिक शिक्षणाचा हक्क, यासह कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ न होण्याचा हक्क या महत्वपूर्ण बाबींचा समावेश करण्यात आला. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यानुसार विविध देशांमध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. भारतात 1993 मध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. देशपातळीवरील मानवी हक्क आयोगाच्या धरतीवर राज्यात 6 मार्च 2001 रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली.

## न्यायालयीन सक्रीयतेची संकल्पना

"न्यायालयीन सक्रीयता म्हणजे ज्याप्रश्नावर धोरणात्मक पुढाकार सर्व स्वीकार्य पालीका किंवा विधीपालीका यांचा असावा अशा प्रश्नावर न्यायालयाकडून जनतेने अपेक्षाकरणे, आणि न्यायालयांनीती अपेक्षा पूर्ण करणे. कायद्याचा नुसताच अर्थ लावण्यावर न थांबता कायदा कसा असावा हे देखिल न्यायालयांनी सांगणे थोडक्यात, न्यायालये त्यांना संविधानाने घालून दिलेली कार्याची मर्यादा ओलांडून अन्य शासनांगाच्या अधिकार क्षेत्राात सक्रीय होतात. न्यायालयांची ही सक्रीयता एक प्रकारे संविधानातील उदात्त लोकशाही मूल्यांना प्रत्यक्षात उतरवते. व्यक्तीचे हक्क व स्वातंत्रय यांना कायद्याच्या वरवंटयाखाली चिरडले जावू नये. तसेच नागरिकांना त्यांचे मूलभूतहक्क मिळावेही संविधान कर्त्यांची अपेक्षा न्यायालयीन सक्रीयतेतून पूर्ण होते. न्यायालयीन सक्रीयतेची तीन प्रकारात विभागणी केली जातेते पुढीलप्रमाणे

अ. निर्वचनात्मक सक्रीयता :–निर्वचनात्मक सक्रीयतेमध्ये न्यायप्रक्रीयतेने सविंधानाचा अन्वयार्थ लावण्याचे कार्य करते. या मध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ केलेल्या निर्वचनाचा समावेश होतो.

**ब. विधिविषयक सक्रीयता :–** या मध्ये विविध विषयावर झालेल्या कायद्यातील त्रुटी किंवा एखादया



Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

विषयांसाठी कायद्याची गरज न्यायालय सुचविते. उदा. लैंगिक शोषनास प्रतिबंधाच्या कायद्याची न्यायालयाने केलेली सूचना.

क. **कार्यकारी सक्रीयता** :–कार्यकारी सक्रीय तेचे प्रमुख उदाहरण म्हणजे दिल्लीच्या वाहन निर्मित प्रदुषणाला आळा घालण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकांशी संबंधित न्यायालयाने दिलेला निवाडा. संविधान आणि संविधानाचे वैरी यांच्यातील संघर्षात न्यायालयीन सक्रीय तासंविधानाच्या बाजूने ठाम पणे उभी राहते. किंबहुना हि कमती आणि विधी निषेध शून्य राजकारण्यांनीच न्यायालयांना सक्रीय होणे भाग पाडले आहे. विधी मंडळांनी लोकांना हवेते देणारे कायदे जर केले असते आणि कार्य पालीके कडून कायद्याची जर नीट अंमलबजावणी झाली असती तर न्यायालयांना सक्रीय होण्याची गरज भासली नसती.

**मानवी हक्कांच्या संरक्षणा मध्ये न्यायालयीन सक्रीयतेची भूमिका :–**

1. **व्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण** :– राज्यघटनेने उदात्ततेने भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे. ते राज्यघटनेचे महत्वाचे तत्व व मूल्य आहे. मांत्र्य त्यांच्या स्वातंत्र्या वर गदा आणण्याचे प्रकार कायद्याच्या विविध पळवाटांमधून होत असल्याचे दिसून येते. व्यक्तीस्वातंत्र्यासाठी विधीमंडळाला अपयश येण्याचे प्रसंगही समोर येताना दिसून येतात. अशा वेळी न्यायालयाने दाखविलेली सक्रीयता महत्वपूर्ण भूमिका पारपाडते.

2. **समाजिकन्याय व समानतेचे रक्षण** :– विविध धर्म, जाती, पंथ असणाया या देशात सर्वांना न्याय देवून समानता राखण्यासाठी सामाजिक न्यायाचे तत्व महत्वपूर्ण ठरते. राज्यघटनेचे महत्वाचे मूल्य असलेली समानता प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या बाबतीत राखलीजाणे गरजेचे आहे. राज्य घटनेतील हे तत्व जोपासण्यासाठी न्यायालय महत्वपूर्ण भूमिका पाडते.

3.**कायद्या समोरील समानता राखण्यासा साठी** :– भारतीय राज्यघटनेतील कलम 15 अन्वये भेदभावास बंदी आणली आहे. कायद्या समोर सर्व व्यक्ती समान असूनही समानता राखली तरच मानवी हक्काचे खऱ्या अर्थाने संवर्धन होणार आहे. भारतातील न्याय व्यवस्थेचेते एक महत्वाचे तत्व आहे. मात्र राजकारण्यांचे वाढते हस्तक्षेप तसेच कायद्यातील विविध पळवाटा यामुळे कायद्या समोरील समानतेच्या या तत्वावर मर्यादा येताना दिसून येतात. त्यासाठी न्यायालयांनी चौकटीच्या बाहेर जावून घेतलेली भूमिका महत्वपूर्ण ठरते.

4.**मूलभूत गरजांची पूर्तता करण्याचा हक्क** :– मानवाला निसर्गताच अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्णकरण्याचा हक्क आहे. या गरजा पूर्णकरण्यासाठी आवश्यक असलेले प्रयत्न करणे व त्यामध्ये येणाऱ्या अडचणींवर मातकरणे या बाबी पारपाडण्यासाठी न्यायालयांची व त्यांनी वेळोवेळी दाखविलेल्या सक्रीयतेची भूमिका महत्वपूर्ण आहे.

5.**अभिव्यक्ती स्वातत्र्याचे रक्षण** :– प्रत्येक व्यक्तीला आपले विचार मांडण्याचा हक्क राज्यघटनेने दिलेला आहे. या हक्कांची पायमल्ली होत असल्याची उदाहरणे साहित्य व कला क्षेत्रात मोठया प्रमाणात दिसून येतात. ही अभिव्यक्ती अबाधित राहिली तरच खऱ्या अर्थाने मानवी हक्काचे रक्षण होईल.त्यासाठी न्यायालयाची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

6. **गुलामगिरी पासून मुक्ततेचा हक्कांसाठी संरक्षण** :–

स्वातंत्र्या नंतर च्या सातव्या दशकातही गुलामगिरी वेगवेगळया स्वरूपात समाजा मध्ये अस्तित्वात असल्याचे चित्र दिसून येते. ग्रामिण व दुर्गम भागातील शेतमजूर हे गुलामगिरीचेच एक उदाहरण आहे. राज्यघटनेनेच गुलामगिरी पासून मुक्ततेचा हक्क नागरिकांना दिलेला आहे. या हक्काची पायमल्ली होत असताना न्यायालयाने घेतलेली भूमिका महत्व पूर्ण ठरते.



Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

**7.महिलांच्याहक्कांचे रक्षण :–** एकविसाव्या शतकातही महिलांना फारमोठया अन्यायाला सामोरेजावे लागत आहे. कौटुंबिक दुय्यमस्थान , स्त्री भ्रूणहत्या, हुड़ाबळी, कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, बलात्कार शारीरिक व मानसिक छळ या बाबींना आजही महिलाबळी पडतअसल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्य घटनेतील हक्क व अधिकाराबरोबरच केंद्रिय महिला आयोग, राज्य महिला आयोग यांची ही भूमिका महिला सबली करणामध्ये महत्वपूर्ण ठरत आहे. महिलांच्या प्रश्नांवर विविध कायदे ही तयारकेल गेले आहेत. यामध्ये हुंडाप्रतिबंध कायदा 1961, वैद्यकीय गर्भपातन कायदा 1971, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा 1994, या सारखे कायदे असूनही महिलां चे प्रश्न मिटले नाहीत. न्यायालयीन सक्रीयता या दृष्टीने महत्वाची ठरते. उदा. महिलांच्या लैंगिक शोषणा सप्रतिबंध कायद्याचा भागन्यायालयाने सुचविला होता

थोडक्यात,मानवीहक्कावरज्याज्यावेळीगदा येण्याचेप्रसंगनिर्माणझालेत्यात्यावेळीन्यायालयानेवेळोवेळी घेतलेलीभूमिकामहत्वाचीठरलीआहेन्यायालयीनसक्रीयतेमुळेमानवीहक्कांचेसंरक्षणहोतानादिसून येतआहे.

**संदर्भ:–**


1. भोळेभा. ल. (2003) भारतीय गणराज्याचेशासनआणिराजकारण , नागपूर , पिंपळापूरप्रकाशन.
2. जोशीस्मिता (2014) मानवीहक्क व जबाबदाऱ्या, पुणे, गणराजपब्लीकेशन.
3. बैरागीवि. ना. (2011) मानवाधिकारसिद्धांत एवंव्यवहार , कानपूर, परागपब्लीकेशन
4. पाटीलबी.बी. (1999) भारतीय शासनआणिराजकारण, पुणे, फडकेप्रकाशन.
5. गवईसुभाष (2009) भारतीय संविधानातील घटनात्मकतरतुदीआणिवास्तव, नागपूर, साईनाथप्रकाशन.




Scanned by CamScanner